सकाळ

Page 10 Select Language



खडकलाट : कर्नाटक सरकारी पब्लिक स्कूलमध्ये सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत मार्गदर्शक पुस्तक देताना सायबर वॉरिअर क्लबचे सदस्य.

# खडकलाट सरकारी स्कूलमध्ये सायबर सुरक्षा मार्गदर्शन

खडकलाट, ता. १३ : डिजिटल युगात विद्यार्थी व युवकांची फसवणूक होत आहे. विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने देवचंद महाविद्यालय (अर्जुननगर) आणि क्विक हिल फाऊंडेशन (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत येथील सरकारी कन्नड पब्लिक स्कूलमध्ये सोमवारी मार्गदर्शन शिबिर झाले.

अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर. एम. गवण्णावर होते. या उपक्रमांतर्गत देवचंद महाविद्यालयातील सायबर वॉरिअर्स रुद्र सुतार, प्राजक्ता खवरे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक, फिशिंग लिंक, मजबूत पासवर्ड, सोशल मीडिया सुरक्षितता, ओटीपी, बँकिंग माहितीची गोपनीयता, सायबर गुन्ह्यांपासून बचाव, सायबर तक्रार नोंदविण्याच्या पद्धतीबाबत माहिती देऊन सायबर वॉरिअर क्लबचे समन्वयक प्रा. प्रशांत कुंभार, प्रभारी प्राचार्य डॉ. आर. एम. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा ही मोहीम सुरू असल्याचे सांगितले.